
आधुनिक विचारांचे
# वर्तमान




बीड । मंगळवार, २३ फेब्रुवारी २०२१ । वर्ष : ३ आपले वृत्तपत्र, आपला आवाज अंक : १८ । पाने : ४ । मूल्य २ ₹

## अपडेट

### कोरोनाविषयक नियमांचे पालन करा : मंत्री मुंडे



बीड : जिल्ह्यात कोरोना पुन्हा डोकं वर काढतोय. रूग्णसंख्येत पुन्हा एकदा वाढ होताना दिसून येत असून आपण या गोष्टीकडे गांभीर्याने बघण्याची गरज आहे. मास्कचा सतत वापर करा, शासकीय नियमांचे पालन करा, गर्दी करणे टाळा, असे आवाहन जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केले.

बीड जिल्ह्यात गेल्या काही दिवसात कोरोना पॉझिटिव्ह रूग्णांची संख्या पुन्हा एकदा काही प्रमाणात वाढताना दिसून येत आहे. दररोज १५-२० च्या आसपास असलेली रूग्णसंख्या एकदम पन्नासच्या पार गेली आहे, त्यामुळे या आकडेवारीकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

### शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या : पंकजा मुंडे



बीड : जिल्हयात गारपिटीसह झालेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत करावी अशी मागणी माजी मंत्री तथा भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांनी केली आहे. अवकाळी पावसाने सर्वच तालुक्यांना झोडपून काढले. यामुळे बहरलेल्या आंब्याचा मोहर उध्वस्त झाला. डाळिंब, पपई, द्राक्षे या फळबागांचे त्याचप्रमाणे ज्वारी, हरभरा, गहू या रब्बी पिकांचेही प्रचंड मोठे नुकसान झाले.

### मास्क न वापरणाऱ्यांविरोधात बीडमध्ये दंडात्मक कारवाई

बीड : शनिवारी सकाळपासून रस्त्यावर उतरत मास्क न वापरणाऱ्या दुचाकी चालकावर दंडात्मक कारवाईला सुरूवात केली. अनेक नागरिकांना दंड ठोठावला आहे. विभागीय आयुक्त सुनिल केंद्रेकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना कोरोनाच्या नियमाबाबत सक्तीच्या सूचना दिल्या. त्यानुसार कडक अंमलबजावणीस सुरूवात झाली. मास्क वापरूनच प्रत्येक नागरिकांना घराबाहेर पडावे, असे आवाहन प्रशासनाकडून केले जात आहे. शनिवारी सकाळपासून पोलीस रस्त्यावर उतरले.

# लेट लतिफांना तहसीलदारांचा ‘दणका’

## वैशाली पाटील ॲक्शनमोडमध्ये; उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या विभागांना ठोकले टाळे

प्रतिनिधी

माजलगाव : माजलगावच्या तहसीलदार वैशाली पाटील या ॲक्शन मोडमध्ये आल्या असून लेट लतिफ कर्मचाऱ्यांना इंगा दाखविला आहे. दरम्यान, सोमवार दि.२२ फेब्रुवारी रोजी सकाळी पाऊणे दहा वाजता स्वतः तहसीलदार पाटील यांनी उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांचे स्टिंग ऑपरेशन करून १० वाजता ज्या-ज्या विभागातील कर्मचारी उशिरा आले, त्या-त्या विभागाला टाळे ठोकले. या कारवाईमुळे कामचुकारांची मात्र चांगलीच तारांबळ उडाली.

तहसीलदार वैशाली पाटील या कामचुकारांना धडा शिकविण्यासाठी चक्क ९ वाजता तहसील परिसरात आल्या. तहसील कर्मचाऱ्यांनी साधारणतः सकाळी पाऊणे दहा कार्यालयात हजर राहणे अपेक्षित असते, मात्र या वेळेत महसूल विभाग, पुरवठा विभाग, संगणक विभाग, संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी निराधार योजना विभाग आदी विभागात अधिकारी,

कर्मचारी गैरहजर जाणवले, यावर तहसीलदार पाटील यांनी तातडीने प्रत्येक विभागाला टाळे ठोकले. काही अधिकारी व कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीसा बजावल्या. उशिरा येणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना टाळ्यावर आणण्यासाठी दर सोमवारी ही मोहीम राबविली जाणार असल्याची माहिती तहसीलदार वैशाली पाटील यांनी 'वर्तमान'शी बोलताना दिली.






टाळे ठोकल्याने वऱ्हांड्यात प्रतिक्षेत असलेले कर्मचारी.




### अवैध वाळु उपशाबाबत जनतेने माहिती द्यावी : तहसीलदार वैशाली पाटील

तालुक्यात सुरू असलेल्या अवैध वाळू उपशाबाबत तहसीलदार वैशाली पाटील म्हणाल्या, माजलगाव तालुक्यात कोठेही अवैध वाळु उपसा सुरू असेल, तर याची पूर्व कल्पना द्या, आम्ही कारवाई करण्यास सक्षम आहोत. दोन पथके याबाबत गस्त घालत आहेत. अवैध वाळु उपसा होवू देणार नाही. असेही आश्वासन वैशाली पाटील यांनी दिले.

# लाचखोर श्रीकांत गायकवाड गजाआड

## ६५ हजारांची लाच प्रकरणी रंगेहात अटक

प्रतिनिधी



माजलगाव : वाळूची वाहतुक सुरळीत ठेवण्यासाठी ६५ हजार रुपयांची लाच चालकामार्फत घेताना येथील उपविभागीय अधिकारी श्रीकांत गायकवाड यांना जालना येथील लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने गुरुवारी रात्री ९ वाजता रंगेहाथ पकडले.

माजलगाव तालुक्यात गोदावरी नदीतून वाळूचा अवैधरित्या उपसा मोठ्या प्रमाणावर होतो. यास वाळू माफियास पाठबळ देण्याचे काम काही स्वरूपात अधिकारी हे करत असतात. माजलगाव तालुक्यालगत वाहणाऱ्या गोदावरी नदीच्या पलीकडे जालना जिल्ह्याची हद्द सुरु होते. दोन्ही भागातून वाळूचा मोठ्या प्रमाणावर अवैधरित्या उपसा होतो. हा अवैध उपसा विना अडथळा होवू द्यावा यासाठी वाळूमाफिया अधिकाऱ्यांना लाच देऊन आपले उखळ पांढरे करतात. यातूनच त्याचाच वाळूचा अवैधरित्या उपसा होऊ द्यावा म्हणून वाळू माफियांनी येथील उपविभागीय अधिकारी यांना सुमारे ६५ हजाराची लाच देऊ केली. ही लाच चालकामार्फत शहरातील संभाजी चौकात घेत असताना त्यांना गुरुवारी रात्री ९ वाजता पकडण्यात आले. सदरील कारवाई जालना येथील लाचलुचपत प्रतिबंधक अधिकारी निकाळजे यांच्या पथकाने केली. या प्रकरणी उपविभागीय अधिकारी श्रीकांत गायकवाड व त्यांचा चालक यांना पढील कार्यवाहीसाठी बीड येथे नेण्यात आले आहे.

### जामीन अर्ज फेटाळला

उपजिल्हाधिकारी श्रीकांत गायकवाड यांना न्यायालयाने ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. पोलीस कोठडीची मुदत संपल्याने श्रीकांत गायकवाड यांना सोमवारी दि.२२ फेब्रुवारी रोजी न्यायालयासमोर उभे करण्यात आले. न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावल्यानंतर गायकवाड यांनी जामिनासाठी अर्ज केला. यावर सत्र न्यायमूर्ती ए.एस.वाघमारे यांच्यासमोर सुनावणी झाली. या प्रकरणात अनेक कागदपत्रे हस्तगत करायची बाकी असून, आरोपी जामिनावर सुटल्यास सदर कागदपत्रे मिळण्यात अडचण येऊ शकते असा ॲड.तांदळे यांनी केला.

# महाराष्ट्रातील कोरोनाचा नवा स्ट्रेन जास्त घातक

## 'एम्स'चे संचालक गुलेरिया यांचा इशारा; देशात आढळले २४० नवीन स्ट्रेन

प्रतिनिधी

महाराष्ट्रात करोना पुन्हा एकदा थैमान घालण्याची भीती व्यक्त केली जात आहे. गेल्या काही दिवसांत करोनाचा प्रसार वाढला असून, रुग्णसंख्येचा वेगही वाढल्याचे आकडेवारीतून दिसत आहे. दरम्यान, या संकटाबरोबर चिंता वाढवणारी एक बाब समोर आली आहे. देशात २४० नवीन करोना स्ट्रेन आढळून आले आहेत. यात महाराष्ट्रात आढळून आलेल्या करोनाच्या नवा स्ट्रेनच्या संसर्गाचा वेग प्रचंड असून, तो जास्त घातक ठरू शकतो, असा इशारा दिल्लीतील एम्स'चे संचालक डॉ. रणदीप गुलेरिया यांनी दिला आहे. या नवीन स्ट्रेनचा ॲण्टीबॉडीज तयार झालेल्या लोकांनाही संसर्ग होऊ शकतो, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला आहे.

एम्स'चे संचालक डॉ. रणदीप गुलेरिया यांनी एनडीटीव्ही या वृत्तवाहिनीशी बोलताना ही माहिती दिली. देशात करोनाचे २४० नवी स्ट्रेन आढळून आले असून, महाराष्ट्रात आढळून आलेला स्ट्रेन जास्त घातक ठरू शकतो, असं ते यावेळी म्हणाले. भारतात हर्ड इम्युनिटी ही कल्पनाच ठरणार आहे. कारण देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ८० टक्के लोकांमध्ये ॲण्टीबॉडीजची गरज आहे. महाराष्ट्रात आढळून आलेल्या नव्या करोना स्ट्रेनचा विचार केल्यास हे अवघड दिसत आहे. कारण या स्ट्रेनच्या संसर्गाचा वेग प्रचंड असून, तो जास्त घातक ठरू शकतो. इतकंच काय तर ज्या नागरिकांमध्ये ॲण्टीबॉडीज विकसित झालेल्या आहेत. त्यांनाही याचा संसर्ग होऊ शकतो, इशारा डॉ. गुलेरिया यांनी दिला.हर्ड इम्युनिटीबद्दल बोलताना गुलेरिया म्हणाले, म्युटेशन्समध्ये (विषाणूचं बदलेलं रुप) किंवा नवीन स्ट्रेनमध्ये प्रतिकार शक्तीपासून बचावाची क्षमता तयार झाली आहे. त्यामुळे लसीमुळे वा करोनातून बऱ्या झालेल्या आणि ॲण्टीबॉडीज तयार झालेल्या माणसांनाही त्यापासून धोका होण्याची शक्यता आहे, असा अंदाज गुलेरिया यांनी व्यक्त केला आहे. महाराष्ट्र कोविड टास्क फोर्सचे सदस्य डॉ. शशांक जोशी यांनीही करोनाच्या उद्रेकाविषयी बोलताना महत्त्वाची माहिती दिली. देशभरात करोनाचे २४० नवीन स्ट्रेन आढळून आले आहेत. त्यामुळेच करोनाच्या संसर्गाचा वेग वाढला असून, महाराष्ट्रातही मबाधित रुग्णांची संख्या वाढताना दिसत आहे, असं जोशी यांनी सांगितलं.



## सकल धनगर समाजाच्या वतीने तात्यांचा सन्मान



धारूर : वर्तमान फाऊंडेशनंचा 'उद्योग भूषण' पुरस्कार माधवतात्या निर्मळ यांना मिळाल्याबद्दल भोपा येथील नर्मदा जिनिंगमध्ये माजलगाव विधानसभा मतदारसंघातील सकल धनगर समाजाच्या वतीने तात्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. याप्रसंगी बीड जिल्हा परिषदेचे सभापती कल्याण आबूज आणि समाज बांधव आदी.









## संपादकीय

# अर्थव्यवस्थेची घडी बसवताना...

कोरोनाच्या महामारीतून बाहेर पडण्यासाठी संपूर्ण जग प्रयत्न करत करताना भारतही मोठ्या हिंमतीने अर्थव्यवस्थेची घडी बसवताना दिसत आहे. आता तर जागतिक नाणेनिधीने सकल राष्ट्रीय उत्पन्नात (जीडीपी) पुन्हा एकदा भारत जगात पहिल्या क्रमांकावर जाण्याचा अंदाज वर्तवला आहे. भारतात अर्थव्यवस्थेच्या विकासाचा दर उणेवरून अधिकाकडे सरकणं ही निश्चितच आश्वासक बाब म्हणावी लागेल. एकीकडे देशाचा अर्थसंकल्प मांडण्याची तयारी सुरू असताना शेअर बाजारात नफेखोरांची चलती दिसत होती. असं असलं तरी भारतीय गुंतवणुकीवर त्याचा फारसा परिणाम झालेला नाही. गेल्या वर्षी कोरोनाकाळात २५ हजारांवर आलेला शेअर बाजार काही दिवसांपूर्वी पन्नास हजारांवर गेला. थेट परकीय गुंतवणूकदार शेअर बाजाराच्या सकारात्मक किंवा नकारात्मक बाबींकडे न पाहता योग्य परतावा आणि सुरक्षितता या मुद्द्यांना प्राधान्य देतात. म्युच्युअल फंड आणि परकीय गुंतवणूकदार मिळून एकूण सरकारी रोख्यांचे केवळ पाच टक्के रोखेधारक असले तरी त्यांच्या सक्रिय व्यवस्थापनामुळे जानेवारी ते डिसेंबर २०२० या कालावधीत सरकारी रोख्यांची सर्वाधिक उलाढाल झाली आहे. आता म्युच्युअल फंडात नागरिकांकडून होणारी गुंतवणूकच नाही तर संस्थात्मक गुंतवणूकही वाढत चालली आहे. म्युच्युअल फंड आणि परकीय गुंतवणूकदार (एफपीआय) यांच्या नावे त्यांची नोंद झाल्याचं केंद्र सरकारच्या आर्थिक व्यवहार विभाग आणि भारतीय रिझर्व्ह बँक यांनी प्रकाशित केलेल्या सार्वजनिक कर्जाच्या आकडेवारीतून समोर आलं आहे. ताज्या आकडेवारीनुसार सरकारी रोख्यांच्या खरेदीमध्ये म्युच्युअल फंड अव्वल स्थानी असल्याचं दिसतं. सरकारी रोख्यांच्या धारणेत २००८-०९ मध्ये एक टक्क्याच्या जवळपास असलेला म्युच्युअल फंडांचा वाटा २०२० अखेरीस तीन टक्क्यांवर पोहोचला आहे. काही वर्षांपूर्वी केवळ संस्थात्मक गुंतवणूकदारांचं वर्चस्व असलेल्या रोखे फंडात अर्थसाक्षरतेमुळे सर्वसाधारण सामान्य गुंतवणूकदारदेखील एसआयपी करत असल्याचं दिसून येतं.

गेल्या दशकभरात म्युच्युअल फंड सर्वव्यापी बनले आणि नवीन गुंतवणूकदारासाठी हा पैसे गुंतवण्याचा एक लोकप्रिय मार्ग असल्याचं स्पष्ट झालं. जानेवारी ते डिसेंबर २०२० दरम्यान म्युच्युअल फंडांनी केंद्र आणि राज्यांच्या विविध रोख्यांमध्ये १.७२ अब्ज रुपयांची गुंतवणूक केली. सरकारी रोख्यांमध्ये मुख्यत्वे रिझर्व्ह बँक, वाणिज्य बँका, विमा कंपन्या, भविष्य निर्वाह निधी न्यास हे अलीकडल्या काळापर्यंत मोठे गुंतवणूकदार होते. अलीकडच्या तिमाहीत म्युच्युअल फंडांनी रिझर्व्ह बँक सोडून उर्वरित सर्व गुंतवणूकदारांना मागे सारत सर्वाधिक सरकारी रोख्यांची खरेदी केल्याचं दिसतं. केंद्र आणि राज्यांच्या रोख्यांमध्ये ८० टक्क्यांपेक्षा जास्त वाटा अन्य गुंतवणूकदारांचा आहे. हे गुंतवणूकदार मुख्यत्वे व्याजाद्वारे मिळणा-या उत्पन्नासाठी आणि नियमांची पूर्तता करण्यासाठी गुंतवणूक करत असल्यानं मुदतपूर्तीपर्यंत रोखे राखून ठेवतात. रोकडसुलभता असल्याने म्युच्युअल फंड आपली गुंतवणूक संतुलित करण्यासाठी सरकारी रोख्यांचा वापर करतात. २०२० मधल्या सरकारी रोख्यांच्या उलाढालीचा विचार केल्यास चारही तिमाहीत म्युच्युअल फंड वर्चस्व राखून होते, असं स्पष्ट होतं. अर्थव्यवस्थेतली विपुल रोकड सुलभता आणि कमी झालेल्या व्याजदरामुळे रोखे फंड गुंतवणूकदारांना जानेवारी ते डिसेंबर २०२० मध्ये दुहेरी अंकात परतावा मिळाला आहे. मोठ्या कंपन्या मुदत ठेवींपेक्षा अल्पकाळात गुंतवणुकीसाठी म्युच्युअल फंडांना पसंती देत असल्यानं फंड उद्योग या रोकड सुलभतेचे लाभार्थी ठरले आहेत. मागील वर्षी रोखे गुंतवणुकीत अनियमितता दिसूनदेखील रोखे गुंतवणूक करणा-या फंडांकडे गुंतवणूकदारांचा ओघ वाढल्याने म्युच्युअल फंडांनी सरकारी रोख्यांची वेगाने खरेदी केली. गेल्या वीस वर्षांत भारताने थेट परकीय गुंतवणुकीचा (एफडीआय) ५०० अब्ज डॉलर्सचा ऐतिहासिक टप्पा ओलांडला आहे. भारतीय रुपयात सुमारे ३७ लाख कोटी रुपये इतकी थेट परकीय गुंतवणूक खेचण्यात भारत यशस्वी ठरला आहे. डिपार्टमेंट ऑफ प्रमोशन ऑफ इंडस्ट्री अँड इंटर्नल ट्रेड'ने (डीपीआयआयटी) प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार २००० मध्ये भारतात ५००.१२ अब्ज डॉलर्सची थेट परकीय गुंतवणूक झाली आहे. सर्वाधिक गुंतवणूक मॉरिशसमधून भारतात आली आहे. मॉरेशिसच्या मार्गाने २९ टक्के इतकी प्रचंड गुंतवणूक भारतात आल्याचं डीपीआयआयटी'ने जाहीर केलेल्या माहितीवरून स्पष्ट होतं. गुंतवणूक येते तशीच ती काढून घेतली जात असते. जपान, थायलंडसह अन्य काही देशांची उदाहरणं घेतली, तर गुंतवणूक होण्याचं आणि नंतर ती काढून घेतली जाण्याचं प्रमाण जास्त आहे. भारतात मात्र थेट परकीय गुंतवणूक झाली, तर लगेच काढून घेतली जात नाही हा अनुभव आहे. आकडेवारीही त्याला पूरक आहे. अमेरिकेची फेडरल बँक व्याजदरात वाढ करत नाही तोपर्यंत भारतात परकीय गुंतवणुकीचा ओघ असाच कायम राहील. गेल्या सहा महिन्यांत भारताला जगभरातून २० अब्ज डॉलर्स प्राप्त झाले आहेत, ते सुद्धा जगभरात कोरोनाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात असताना भारत सलग दुस-या वर्षी चीनला मागे टाकत जगातली सर्वात जास्त सार्वभौम संपत्ती निधी गुंतवणूक प्राप्त करणारा देश बनला आहे. एवढंच नव्हे, तर भारताने या वर्षी आतापर्यंत चीनपेक्षा तिप्पट जास्त सॉव्हरीन वेल्थ फंड गुंतवणूक केली आहे. २०१९ पासून आतापर्यंत चीनचा दबदबा राहिला होता. ४०० हून अधिक सॉव्हरीन वेल्थ फंडाची निगराणी करणारी संस्था असलेल्या ग्लोबल एसडब्ल्यूएफच्या आकडेवारीनुसार, या वर्षी आतापर्यंत सॉव्हरीन फंड्समध्ये भारतात विक्रमी १४.८ अब्ज डॉलर (१.१० लाख कोटी रु.) भांडवल गुंतवलं गेलं आहे. प्राप्त परिस्थितीमध्ये अर्थतज्ज्ञांच्या मते भारतातील गुंतवणूकदार वाढत असल्याचं हे भारतीय अर्थव्यवस्थेसाठी शुभसंकेत आहेत.

# विश्ववंदनीय राजा

**रयतेचे राजे विश्ववंदनीय छत्रपती शिवाजी महाराज यांची १९ फेब्रुवारी हा जयंतीदिन त्यानुषंगाने अभ्यासपूर्ण लेख वर्तमानच्या वाचकांसाठी देत आहोत.**



**आज-काल**



**प्रा.राम कटारे**

छत्रपती शिवाजी महाराज हे भारतीय इतिहासातील महान तसेच आदर्श राजे होते त्यांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथील शिवनेरी या किल्ल्यावर झाला त्यांच्या आईचे नाव माँसाहेब जिजाऊ होते तर वडिलांचे नाव शहाजीराजे भोसले हे होते. शिवरायांचे बालपण खुप धामधुमीत गेले त्यांनी वयाच्या १२ व्या वर्षापर्यंत आई जिजाऊंच्या देखरेखीखाली व शहाजी राजांनी नेमलेल्या नामवंत शिक्षकांकडून अनेक कला विद्या-भाषा अवगत केल्या. शिवरायापुर्वी सुमारे ४०० वर्ष महाराष्ट्रात स्वराज्य नव्हते, महाराष्ट्राचा बहुतांश भाग अहमदनगरचा निजामशाह व विजापूरचा आदिलशाहा यांच्या सत्तेत होता याविरूद्ध लढण्यासाठी व जनतेला कायमचे सुखी करण्यासाठी शिवरायांनी स्वराज्यांचे पवित्र कार्य हाती घेतले त्यांनी वयाच्या अवघ्या १५ व्या वर्षी तोरणा किल्ला जिंकून स्वराज्यांचे तोरण बांधले शिवराय जरी वयाने लहान असले त्यांच्या तरी त्यांच्या मनाची भरारी प्रचंड मोठी होती त्यांनी महाराष्ट्रात जीवास जीव देणारे मावळे निर्माण केले शिवरायांनी विजापूरच्या दरबारातील भारी अफजलखानास शक्तीपेक्षा युक्तीने धुळीस मिळवले त्यांच्या आयुष्यात घडलेला प्रत्येक प्रसंग महाराष्ट्रात प्रेरणा देतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी गनिमी कावा या तंत्राचा अवलंब करून अनेक गड किले जिंकले या तंत्राचा वापर करतांना त्यांना सह्याद्री पर्वतातील घनदाट जंगल, डोंगरी किल्ले, प्रजेचा पूर्ण पाठिंबा मिळाला शिवाजी महाराजांनी लोकांमध्ये देशप्रेम व आत्मविश्वास निर्माण केला. छत्रपती शिवाजी महाराजांनी इंग्रज, सिद्धदी व पोर्तुगीज यांना दरारा वाटावा असे भक्कम आरमार उभारले शिवाजी महाराजांना भारतीय आरमारांचे जनक म्हटले जाते, त्यांनी आपल्या संताचा, विदवानांनचा सत्कार केला. मंदिर व मशिदीचे रक्षण केले पर्यावरण संरक्षणाला प्राधान्य दिले स्त्रियांचा नेहमी सन्मान केला. आदर्श पवित्र, कुशल संघटक, रयतेचा वाली, दुर्जनाचा कर्दनकाळ व सजनांचा कैवारी छत्रपती शिवाजी महाराज होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेला सुखी, समृद्ध करण्यासाठी स्वराज्य स्थापण्याचे पवित्र कार्य त्यांनी हाती घेतले भांडखोर वतनदारांना त्यांनी वठणीवर आणले स्वराज्याच्या कामी त्यांचा उपयोग करून घेतला. रयतेवर अन्याय करणार्या सत्तांशी शिवाजी महाराजांनी झुंज दिली जुलमी राजवटीचा पराभव केला रयतेला स्वताचे स्वराज्य स्थापन करून दिले, हे स्वराज्य सर्व जातीधर्मातील लोकांचे आहे, स्वराज्यात कोणताही भेदभाव नव्हता छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यात हिंदू व मुस्लिम आसा कधीही भेदभाव केला नाही, सर्व जातीधर्मातील लोकाना समान, सारखीच वागणूक दिली, धर्मातील साधुसंतांचा त्यांनी नेहमीच सन्मान केला, संत तुकाराम महाराज यांच्या किर्तनाला ते नेहमी जायचे त्यांचा आदर्श-मार्गदर्शन घेत आसत अशी ही छत्रपती शिवाजी महाराजांची थोर कामगिरी पहिली की प्रत्येकाला दहा हत्तीचा बळ येथे.

छत्रपती शिवाजी महाराजांना उत्तम राज्यकारभार कसा करावा, शत्रूंशी युद्ध कसे करावे, किल्ले कसे बांधावे, घोडे व हत्ती यांची परीक्षा कशी करावी, शत्रुच्या दुर्गम प्रदेशातून निसटून कसे जावे अशा आनेक विद्या शिवरायांना अवगत झाल्या. शिवरायांची शिक्षणातील ही प्रगती पाहुण मँसाहेब जिजांऊ यांना मोठा आनंद होई. शिवरायांच्या नावाने जहागिरीचा कारभार सुरू झाला होता, शहाजीराजांनी शिवरांयांची स्वतंत्र राजमुद्रा तयार केली होती ती मुद्रा अशी

!! प्रतिपच्चंद्रलेखेव
वर्धिष्णुर्विश्ववंदिता!!
!! शाहसूनो शिवस्यैषा
मुद्रा-भद्राय राजेते !!

प्रतिपदेच्या चंद्रकलेप्रमाणे वाढत जाणारी आणि सार्या विश्वाला वंद्य होणारी अशी शहाजीराजेंचा पुत्र शिवाजीराजे भोसले यांची राजमुद्रा लोकांच्या कल्याणासाठीच आहे. असे सागणारी ती राजमुद्रा म्हणजे स्वराज्यांच्या स्थापनेचा संकेतच होता. स्वराज्यावरील आलेले अफजलखानाचा संकट दुर करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांनी जुलमी, कपटी व रयतेवर अन्याय करणार्या अफजलखानाचा प्रतापगडाच्या पायथ्याशी शिवरायांनी आपल्या चातुर्य, बुद्धी आणि युक्तीने कपटी अफजलखानाचा कोतळा बाहेर काढून त्या वध केला व स्वराज्यांवरील आलेल मोठा संकट दूर केले, जलमी,रयतेवर सातत्याने अन्याय करणार्या शाहिस्तेखान यांची ५ एप्रिल १६६३ रात्रीच्या वेळेस खानाची तीन बोटे कापली गेली खानाच्या प्राणांवर आले होते ते बोटावर निभावले यामुळे शाहिस्तेखानाने पुन्हा स्वराज्यातील रयतेवर कधीही अन्याय केला नाही, पन्हाळा गडावर सिद्दी जौहरने घातलेला वेढा हा कुपच भयानक होता, यातुन सुटका करणे अशक्यच होते परंतु छत्रपती शिवाजी महाराज यांनी युक्तीने आपली पन्हाळा गडावर शुरविर मावळ्यांच्या साथीने सुखरूप सुटका करून घेतली हे सारे पाहुन सिद्दी जौहर आचर्य चकित झाला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चातुर्य, संघटन, बुद्धी, कौशल्य तसेच अठरा पगड जातीच्या शूरवीर मराठा शुरविर सरदार मावळ्यांच्या जोरावर रयतेला नेहमी सखी समृद्ध करण्यासाठी प्रयत्न केला, शेतकरी, कष्टकरी, सर्व सामान्य रयतेतील लोकांना न्याय, हक्क मिळवुन दिले, स्वराज्यातील प्रत्येकाला मोठ्या उत्साहात सन, उत्सव आनंदाने साजरी करण्यासाठी आपले आयुष्य पनाला लावले व रयतेला स्वताचे स्वराज्य मिळवुन दिले. अदिलशाही, निजामशाही कुतुबशाही, बिदरशाही, इंग्रज, डच, पोर्तुगीज या परकीय आक्रमणानी रयतेचे हाल केले होते, रयतेवर सारखे अन्याय, अत्याचार केले या शाहीविरोद्ध छत्रपती शिवाजी महाराज व मराठा शुरविर सरदारांनी गनिमी कावा करून या परकीय सत्ताना मातीत गाडले रयतेला स्वताचे स्वराज्य मिळवुन दिले, स्वराज्य मिळवुन देण्यासाठी मराठा शुरविर सरदारांनी आपले पावलोपावली प्राण दिले , रयतेसाठी व शिवरायांनसाठी रक्त सांडले.आठरा पगड जातीच्या शूरवीर मराठा सरदार मावळ्यांनी शिवरायांना शेवटपर्यंत साथ दिली मॉसाहेब जिजाऊ यांचे देखणे स्वप्न शिवरायांनी सत्यात उतरलेले होते ही घटना भारतीय इतिहासात अजरामर झाली. छत्रपती शिवाजी महाराज संपुर्ण जगातील सेनानायकांच्या क्रमांकात शिवाजी महाराजांचे स्थान प्रथम दर्जाचे आहे १६४५ ते १६८० या शिवरायांच्या संपूर्ण कारकिर्दीत सामर्थशाली मोगलांचा किवा विजापूरचा असा एकही हिंदू किवा मुस्लिम सेनानायक नव्हता शिवाजी महाराजांच्या प्रजेचा असामान्य कल्पकता हा महत्त्वाचा पैलू होता आणीबाणीच्या प्रसंगात ते योग्य ती कल्पकता वापरीत आणि शत्रूचे कपट फसवणूक, गुप्त कारखाण्यांना शिवरायांनी आयुष्यात कधीही दाद उलटपक्षी आपल्याच जाळ्यात शत्रुला पकडण्यात ते यशस्वी ठरले.

छत्रपती शिवाजी महाराज हे युगपुरुष होते असे गृणणे सार्थ ठरते महाराजांच्या या कार्यामुळे त्या काळातील जनता नवे वैभव स्वराज्याच्या रूपात पाहत होती ती स्वराज्याची सृष्टि प्रत्येकक्षात सत्यात उतरविली शिवाजी महाराजांनी शासनात शिस्तबद्धता निर्माण केली न्यायदांनात निःस्पृहता दर्शविली, गैरकारभार करणार्या आधिकार्याना मुलाहिजा न ठेवता शिक्षा केली जात असत, शिवराय वेळोवेळी योग्य तोच निर्णय घेऊनच न्यायनिवाडा करत असत, सर्व धर्माना समान लेखले परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट आढळते ती म्हणजे रयतेची काळजी, रयतेला लेकराप्रमाणे माननारा हा राजा केवळ महान युगपुरुष नव्हता तर मानवतेचे उत्कृष्ट तत्वज्ञान सागणार्या महात्मा प्रमाणे ते वंदनीय थोर राजे होते, आशा महान राज्याची जयंती राष्ट्रपिता महात्मा फुले यांनी सुरू केलेला दहादिवशीय शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात, सामाजिक उपक्रम व शिवरायांचे उत्कृष्ट पुस्तके वाचून महात्मा फुले यांनी १९ फेब्रुवारी १८६९ रोजी सुरू केलेला जगातील पहिला शिवजन्मोत्सव हा सामाजिक उपक्रम राबवून आदर्श शिवजन्मोत्सव साजरा केला, अशाप्रमाने छत्रपती शिवाजी महाराज व आठरा पगड जातीच्या शुरविर मराठा सरदार, मावळ्यांच्या कार्याला पेरक ठरेल,आशा या महान राजाला त्यांच्या जयंतीनिमित्त कोटी-कोटी प्रणाम.

# सरकारला धडकी भरवणारं भाषण

**संसदेत ज्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणांची चर्चा व्हावी असे फार कमी खासदार आहेत. पश्चिम बंगालच्या तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा त्यापैकी एक. राष्ट्रपतींच्या अभिभाषणाला उत्तर देताना त्यांनी केलेलं भाषण मोदी सरकारला आरसा दाखवणारं होतं. वेगवेगळ्या मुद्यांवर प्रभावी भाष्य करत त्यांनी सरकारवर जोरदार टीका केलीय. त्यांच्या भाषणाचा अनंत घोटगाळकर यांनी मराठीत केलेला अनुवाद सध्या वायरल होतोय.**



**विशेष**

**महुआ मोईत्रा**

त्यावेळी काम करत असलेल्या मुख्य न्यायाधीशावर लैंगिक छळाचा आरोप झाल्यानंतर त्याबद्दलचा खटला स्वतःच्याच अध्यक्षतेखाली चालवून त्यांनी स्वतःलाच दोषमुक्त केलं. झेड क्लास सुरक्षा कवचासोबत मिळालेल्या निवृत्तीनंतर तीन महिन्याच्या आत वरिष्ठ सभागृह सदस्यत्वाचं नामांकन स्वीकारलं. त्यादिवशीच तिचं पावित्र्य संपलं.

महोदय, आपल्या लोकशाही प्रजासत्ताकाची पायाभूत तत्वं मजबूत करण्याची आणि आपल्या राज्य घटनेच्या तिसऱ्या भागातले अधिकार बळकट करण्याची सर्वोच्च न्यायपीठाच्या कोणत्याही पीठाला आजवर मिळाली नसेल अशी सर्वोत्कृष्ट सुवर्णसंधी न्यायव्यवस्थेने गमावली. त्या दिवशी ती पवित्र राहिली नाही. त्याऐवजी त्यांनी चालत निघालेल्या स्थलांतरित मजुरांना मृत्यूच्या खाईत लोटलं. आमच्या श्रेष्ठतम आंदोलक कार्यकर्त्यांना आणि आधुनिक लेखकांना तुरुंगात सडू दिलं. एखादा विनोद केला म्हणून आमच्या तरुण मुलांचा छळ होत असताना न्यायव्यस्था मूकपणे पहात बसलीय. संसद आणि फक्त संसदच कायदा करु शकते हे सत्तेच्या विभाजनाचं घटनात्मक तत्व न्यायव्यवस्था विसरलीय असं दिसतं. कायद्यात काही दोष असेल तर न्यायालय तो कायदा घटनाबाह्य ठरवून रद्दबातल करू शकते. पण तसं नसेल तर मात्र न्यायालयाने कायद्याला हात लावता कामा नये. सरकारने लोकांना मान्य नसलेले कृषी कायदे आणले असतील तर एकतर सरकारने कायदे मागे घेतले पाहिजेत किंवा लोकांनी सरकारला मतदानाचा अधिकार वापरून सत्तेवरून हाकलले पाहिजे.

आज आपल्याला आणीबाणीच्या काळात उच्च न्यायालयांनी एडीएम जबलपूरबद्दल किंवा तत्सम निर्णय देताना दाखवली तशा परिपक्वतेची आणि धैर्याची गरज आहे. दुर्दैवाने सर्वोच्च न्यायालय सामान्य लोकांबद्दलचं आपलं कर्तव्य पार पाडत असलेलं दिसत नाही. ते खास लोकांचं आणि कहर म्हणजे स्वतःचंच रक्षण करताना दिसतं. वस्तुनिष्ठ बातम्या न पुरवणं आणि वृत्तपत्रीय नीतिमूल्यांचा संपूर्ण अभाव याबद्दल भारतीय माध्यमाचा एक प्रचंड मोठा घटक रोजच्या रोज अधिकाधिक खोल गर्तेत कोसळताना दिसतोय. अशा पध्दतीने नीतिमूल्यांच्या मापदंडाने अगदीच तळ गाठलेला असतानाच एक मोठी सरकारधार्जिणं चॅनेल आणि टीवीच्या प्रेक्षक संख्येचं मूल्यांकन करणाऱ्या यंत्रणेचा प्रमुख यांच्यातला व्हाट्सअपवरचा संवाद निव्वळ गलिच्छ हातमिळवणीचं आणि सहचर भांडवलशाहीचं उघडउघड दर्शन घडत आहे. उपरोध असा की, याच भांडवलशाहीपासून आम्हा नागरिकांचे रक्षण करत असल्याचा दावा हे सरकार करत आहे. दृढ निर्धार दाखवणाऱ्या उरल्यासुरल्या मोजक्या पत्रकारांना यूएपीए आणि इतर जुलमी कायद्यातल्या तरतुदी वापरुन लक्ष बनवलं जातंय. तुम्ही लोक आणीबाणीच्या नावाने काँग्रेसला सतत टोमणे मारत असता पण आज या क्षणी आपला भारत एका अघोषित आणीबाणीच्या दहशतीखाली आहे. पण सरकारचं गणित चुकलेलं आहे. भ्याडपणा आणि धैर्य यात एक मूलभूत फरक आहे. सत्ता आणि अधिकार यांचं शस्त्र हाती असतं तोवरच भ्याड लोक शौर्य दाखवतात. खरे शूरवीर मात्र निःशस्त्र असले तरी लढत राहतात. हे नीट लक्षात असू द्या तुमच्या. पोलीस आणि नोकरशाही यांच्या मदतीने गाझीयाबादमधल्या अधिकाऱ्यांना निदर्शनाची जागा रात्रीच्या रात्री खाली करण्याचे आदेश देताना तुम्ही हे विसरू नका. तुम्ही कुणी धाडसी शूरवीर नाही. सत्तेचे शस्त्र परजणारे डरपोक लोक आहात तुम्ही.खरे शूर लोक खेड्यापाड्यातून झुंडीने येत आहेत. ते कोणतेही शस्त्र, काहीही परजत येत नाहीत. पण आपलं साध्य न्याय्य आहे यावर त्यांचा ठाम विश्वास आहे. त्यांच्या नेत्याच्या उत्स्फूर्त अश्रूंनी त्यांना इथं येण्याचं बळ मिळालंय. पाण्याचा मारा करणाऱ्या कुठल्या यंत्रांच्या आधारे नव्हे! रस्ते बंद करताना आणि हरियाणातल्या सतरा जिल्ह्यातल्या इंटरनेट सेवा बंद करताना तुम्ही हे मुळीच विसरू नका. शूर नाही आहात तुम्ही लोक. शस्त्रं परजणारे निव्वळ डरपोक आहात. एकटं हरियाणा राज्य देशाच्या हवाई दलाला १० टक्के मनुष्यबळ पुरवतं. आपल्या आरमाराच्या एकूण ताकदीच्या ११ टक्के ताकद एकट्या हरियाणातून येते. या लोकांना ना तुम्ही राष्ट्रविरोधी ठरवू शकता, ना दहशतवादी, ना गद्दार! साठ दिवस चाललेल्या शांततापूर्ण चळवळीचं कपटकारस्थानं करुन, अपहरण करून पंजाबी शेतकऱ्यांवर एफआयआर नोंदवताना हे विसरू नका. धाडस नाही दाखवत यातून तुम्ही. शस्त्रसज्ज डरपोक आहात. कितीतरी वर्षांपूर्वी १७८७ साली बाघेल सिंग आणि जस्सा सिंग अहलुवालिया यांनी आपल्या सैन्याचं नेतृत्व करत मुघलांकडून दिल्ली काबीज केली होती. त्यांच्या वारसांना शौर्याचे धडे तुमच्याकडून घेण्याची गरज नाही. तुम्ही तर परवा परवा २०१४ मधे दिल्लीचा ताबा घेतला आहे. सरदार बंदा सिंग बहादूर यांच्यावरची बंदा बीर बंदिवान योद्धा या आपल्या कवितेत टागोरांनी लिहिलंय, 'एसेचे से एकदिन, जीवनमृत्यू पायेर भ्रितो , चित्तो वबोनहीन, एसेचे से एकदिन ' तो संस्मरणीय दिवस आता आलाय. सुभाषचंद्र बोस यांच्या १२५ व्या जयंतीवर्षी या केंद्र सरकारने सुभाषबाबूंच्या वारशावर आपला स्वतःचा हक्क नोंदवण्याचा एकही प्रयत्न सोडलेला नाही. शौर्याच्या आपल्या स्वतःच्या बनावट संकुचित व्याख्येत त्यांचा वारसा बसवण्याचा सगळा प्रयत्न केलेला आहे. पण देशाला हे समजलं पाहिजे की, नेताजींच्या दोन ललकाऱ्या होत्या. या दोन्ही ललकाऱ्या त्यांच्या शौर्याचं आणि त्यांच्या उद्दिष्टांचं मूर्त रुप होत्या. त्यापैकी एक होती सलामी, अभिवादन. जय हिंद!

आज या सरकारने या राष्ट्रीय अभिवादनाच्या जागी एक संकुचित धार्मिक उद्घोष आणलाय. त्याचा वापर ते लोकांना सतावण्यासाठी, धमकावण्यासाठी, अल्पसंख्यांकांना सत्तेवर कोण आहे याची आठवण करुन देण्यासाठी करतायत. नेताजींची दुसरी घोषणा होती चलो दिल्ली'! हे सरकार नेताजींची तोंडपूजा करताना स्वतःच्याच तोंडावर आपटतं. पण सत्य हे आहे की सिंघू, गाझीपूर, तिगरीमधे भिंती बांधून, टोकदार सळ्या खुपसून सगळ्या सीमा बंद केल्या आहेत. सुभाषचंद्र यांच्याप्रमाणेच आपणही बंदिवास मुळीच मान्य करणार नाही हे तुम्हाला सांगण्यासाठी दिल्लीला येऊ इच्छिणाऱ्या लोकांच्या वाटा तुम्ही अडवल्यात. आपल्या भारताच्या नियतीवरचा आपला विश्वास कधी ढळू देऊ नका हीच सुभाषबाबूंची आम्हाला शिकवण आहे. आणि भ्याड लोकांनी हा देश चालवावा ही भारताची नियती असूच शकत नाही. आपण धैर्य दाखवण्याची वेळ आज आलेली आहे.

गिरते है शहसवार ही
मैदान- ए- जंग में
वो तिफ्ल क्या गिरे
जो घुटनों के बल चले

रद्द करा हे कायदे - बाकी तडजोड नाही! धन्यवाद! (समाप्त)

# तब्बल १३० सहकारी संस्था निवडणुकीपासून राहणार वंचित

## डीसीसी बँक निवडणूक; माजलगाव तालुक्यातील चित्र

▶ प्रतिनिधी

माजलगाव : बीड जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता आहे. या बँकेसाठी मतदार असलेल्या माजलगाव तालुक्यातील तब्बल १३० विविध सहकारी संस्थांच्या निवडणुका मागील दोन वर्षापासून रखडल्या असल्याची माहिती समोर आली आहे. मुदत संपल्यानंतर त्याच विद्यमान पदाधिकाऱ्यांना मुदतवाढ देण्यात आली आहे. या निवडणुका घेतल्या असत्या तर जिल्हा बँकेच्या निवडणुकीत नूतन पदाधिकाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावता आला असता, अशी चर्चा करण्यात येत आहे.

माजलगाव येथील सहायक निबंधक कार्यालयांतर्गत तालुक्यातील १८१ सहकारी संस्थांची नोंदणी आहे. यापैकी तब्बल १३० संस्थांच्या निवडणुका दोन वर्षापासून रखडल्या आहेत. यात २९ सेवा सहकारी सोसायट्यांचा समावेश आहे. डिसेंबर २०१९ पूर्वी ४० सहकारी संस्थांची मुदत संपलेली होती. त्या संस्थांची निवडणूक घेण्याची संधी असताना दुर्लक्ष करण्यात आले, तसेच उर्वरित ९० संस्थांची मुदत कोरोनाच्या काळात संपलेली आहे.

त्यामुळे निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत.माजलगाव तालुक्यात एकूण ४८ सेवा सहकारी सोसायट्या आहेत. या सोसायट्यांमधील २९ सेवा सहकारी सोसायट्या निवडणुकीला पात्र आहेत. त्याचबरोबर ५३ सहकारी पतसंस्था असून, २८ मजूर सहकारी संस्थांचीही मुदत संपलेली आहे. औद्योगिक सहकारी संस्था, गृहनिर्माण सहकारी संस्था, अभिनव सहकारी संस्था आणि सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था मिळून ४८ संस्थांची मुदत संपली असल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक चुरशीची बनत चालली आहे. या बँकेच्या निवडणुकीत सेवा सहकारी सोसायट्यांचे चेअरमन, नागरी बँका, पतसंस्थांसह इतर सहकारी संस्थांचे मतदान असते. त्याच्यासाठी राखीव जागाही ठेवण्यात आल्या आहेत. मात्र, यात मतदानाचा हक्क मुदत संपलेल्या पदाधिकाऱ्यांनाच बजावता येणार आहे. त्यामुळे अनेक इच्छुकांचाही हिरमोड झाल्याचे दिसून आले.

मार्च २०२० मध्ये अनेक संस्थेच्या निवडणुका होणार होत्या परंतु लॉकडाऊनमुळे या निवडणुका पुढे ढकलल्या. आता डिसेंबर १९ अखेरीस निवडणुकीत पात्र ४० संस्थेच्या पहिल्या टप्यातील यादया मागवण्यात आल्या आहेत. त्यामुळे लवकरच निवडणुका घेतल्या जातील.

: **व्ही.एल.पोतंगळे,** सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था माजलगाव



**या महिन्यात होत्या निवडणुका**

१ जानेवारी ते ३१ मार्च २०२०
**– ४८ संस्था**

१ एप्रिल ते ३० जून २०२०
**– २९ संस्था**

१ जुलै ते ३० सप्टेंबर २०२०
**– ९ संस्था**

१ ऑक्टो. ते ३१ डिसेंबर २०२०
**– ४० संस्था**

# संत सेवालाल महाराजांनी दिली परिवर्तनाची प्रेरणा

## प्रा.डॉ.प्रेम राठोड यांचे प्रतिपादन

▶ प्रतिनिधी



माजलगाव : संत सेवालाल महाराज यांनी समाजात परिवर्तनाची प्रेरणा दिल्याचे प्रतिपादन गणितशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.प्रेम राठोड यांनी केले. ते श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात राष्ट्रसंत सेवालाल महाराज यांच्या जयंती कार्यक्रमात बोलत होते.

पुढे बोलताना प्राध्यापक डॉ.प्रेम राठोड म्हणाले की, आपल्या महाराष्ट्राला संतांची पुरातन अशी परंपरा आहे. महाराष्ट्राच्या मातीला जसा पराक्रमाचा वारसा आहे तसाच संतांच्या विचारांचा गंधही आहे. महाराष्ट्रच्या भूमीत अनेक जाती धर्मातील साधू संत, प्रबोधनकार, कीर्तनकारांनी जन्म घेतला. महाराष्ट्राची जडणघडणंच मुळी संतांच्या विचारातून झालेली आहे. त्यांच्या शिकवणुकीमुळेच आज संपूर्ण समाज पुन्हा गुण्यागोविंदाने नांदत आहे. फिरत्या व्यापाराच्या निमित्ताने भारतभर भ्रमंती करीत असताना संत सेवालाल महाराजांना भारतातील अनेक संतांच्या कार्याविषयी माहिती मिळाली. त्यातून सत्याचा शोध घेऊन आपल्याला समाजाला जीवन जगण्याचा खरा मार्ग दाखविला. या कार्यक्रमास डॉ.गजानन होन्ना, प्रा. युवराज मुळये व महाविद्यालयातील कर्मचारी प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचालन आयक्युएसीचे कॉऑर्डिनेटर प्रा.डॉ.विनायक देशमुख यांनी केले. तर कार्यक्रमाचे आभार चि.आकाश चव्हाण यांनी मानले.

# शिवाजी महाराज डाके यांची सचिवपदी निवड

▶ प्रतिनिधी

माजलगाव : अखिल भारतीय वारकरी मंडळ पुणे विभागीय समितीच्या सचिवपदी प्रसिद्ध युवागायक शिवाजी महाराज डाके यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प.प्रकाश महाराज बोधले व संगितरत्न पं.कल्याण गायकवाड, ह.भ.प.दिपक महाराज खांदवे यांच्या हस्ते डाके यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय व्यापक बैठकीत राज्यातील पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून ह.भ.प.शांतीब्रम्ह मारोती महाराज कुल्हेकर उपस्थित होते. तर सद्गुरु ह.भ.प. माऊलीनाथ महाराज वाळंजकर, ह.भ.प.सुमंत बापु हंबीर यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. युवागायक शिवाजी महाराज डाके यांचे संगीतक्षेत्रात संपूर्ण भारतभर काम असून गायनातील उल्लेखनीय कामगिरी पाहता त्यांना पुणे विभागीय कमिटीच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली.








माजलगाव : पंचायत स्तरीय रोजगार हमी योजना समितीचे अध्यक्षपदी श्रीहरी मोरे, माजलगाव शहर दक्षता समितीच्या अध्यक्षपदी खलील पटेल यांची निवड झाल्याबद्दल वर्तमान कार्यालयात त्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा परिषद सभापती कल्याण आबुज, सरपंच कृष्णा बोचरे पाटील, नवनाथ धायजे, 'वर्तमान'चे मुख्य संपादक भगीरथ तोडकरी, सचिन पट्टेकर, कृष्णा कानडे आदी.

# गोरबंजारा राज पुस्तक संशोधकांना प्रेरणादायी

## आमदार प्रकाश सोळंके यांचे गौरवोद्गार; राजकुमार राठोड यांच्या पुस्तकातून

▶ प्रतिनिधी

माजलगाव : गोर बंजारा समाजाची संस्कृतीची वैभवशाली परंपरा जपण्यासाठी समाजातील सर्व स्तरांतील घटकांनी पुढाकार घेण्याची गरज आहे, राजकुमार राठोड यांचे गोरबंजारा राज पुस्तक हे संस्कृतीची जोपासना करणारे संशोधनात्मक पुस्तक असून हे संशोधक, लेखक, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्था व समाज बांधव व भगिनींना प्रेरणादायी ठरेल, असे गौरवोद्गार आमदार प्रकाश सोळंके यांनी काढले.

कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद लेखक राजकुमार राठोड यांच्या गोरबंजारा राज या पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात आमदार प्रकाश सोळंके बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



आमदार राजेश राठोड हे तर माजी आमदार मोहनराव सोळंके यांची उपस्थिती होती. उद्घाटनपर भाषणात आमदार प्रकाश सोळंके म्हणाले की, गोर बंजारा समाजाला ऐतिहासिक पार्श्वभूमी असल्याने त्याला खूप महत्त्व आहे. सिंधू संस्कृती ही जगातील फार प्राचीन संस्कृती आहे या संस्कृतीची नाळ गोरबंजारा संस्कृतीशी जोडलेली आहे त्या संस्कृतीचे जतन केले पाहिजे प्राचीन लोकगीतांमधून या संस्कृतीचा परिचय होतो गोर बंजारा समाजाच्या पाऊलखुणा या प्रेरणा देणाऱ्या ठरलेल्या आहेत गोर बंजारा समाजाचे प्रबोधनाचे कार्य हाती घेतले तर निश्चितच परिवर्तन होण्यास मदत होईल. अध्यक्षीय समारोपात आमदार राजेश राठोड म्हणाले की, गोर बंजारा संस्कृतीचे संवर्धन व्हावे यासाठी पुस्तक रूपाने राजकुमार राठोड यांनी लिहिलेले पुस्तक संशोधकांना उपयुक्त ठरेल गोरबंजारा संस्कृतीचे दर्शन ही त्यांच्या लोकगीतातून लोकसंस्कृती मधून सातत्याने होते बंजारा लोक जीवन हे एकमेव अद्वितीय आहे. प्रास्ताविक राजकुमार राठोड यांनी केले. कार्यक्रमास डॉ.एन.टी. वडजे, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक, जयदत्त नरवडे, उपसभापती डॉ.वसिम मनसबदार, डॉ.बी.एल.चव्हाण, चंद्रकांत वानखेडे, पत्रकार हरीश यादव, शरद बोराडे, रमाकांत सुतार, रामदीप डाके, अंकुश डाके, नारायण झोडगे, लक्ष्मण बेडसकर, प्रा.संपत चव्हाण, अशोक राठोड, बाळासाहेब देशमुख, अंकुश डाके, ड.रमेश राठोड, युवराज आडे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन अर्चना जाधव व रोहित जोशी यांनी केले, शितल जाधव यांनी सुमधुर गायन केले. आभार प्रदर्शन अशोक वाडेकर यांनी केले.



# शिवजन्मोत्सव सोहळ्यात ७१ दात्यांचे रक्तदान

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शहरातील नवनाथ नगर येथील शिव छत्रपती मित्रमंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सव सोहळ्यात ७१ दात्यांनी रक्तदान केले.

शहरात मिरवणूक न काढता शिवप्रेमींनी आपापल्या गावात, आपापल्या घरी रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, रुग्णांना फळे वाटप अशा वेगवेगळ्या सामाजिक उपक्रमांनी शिवजयंती साजरी केली. या धर्तीवर शिवछत्रपती मित्र मंडळाच्या वतीने रक्तदान शिबीर घेण्यात आले. शिबीर यशस्वी करण्यासाठी सचिन कराळे, ओमकार सावंत, शाम घटे, आकाश शिंदे, सचिन साखरे, आकाश शेडुते, गोविंद बुरांगे, वैभव डुकरे, वैभव राऊत, विशाल कुठे, गजानन गायगवे, गणेश नित्रुडकर, गोपीनाथ पेठकर, गणेश रुद्रवार यांनी परिश्रम घेतले.

# श्री मंगलनाथ मल्टीस्टेटमध्ये शिवजयंती

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील श्री मंगलनाथ मल्टीस्टेट येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या मुख्यालयात केले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अॅड.रविंद्र कानडे होते. या वेळी बोलतांना त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र आणि विचार यावर आधारित समाजाची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले.

# प्रेमात हवी समर्पणाची भावना

**विशेष**

**जुनैद आतार**

काळानुसार माणसाच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शारीरिक, भावनिक गरजा बदलत जातात. त्यात अनेक स्थित्यंतरं घडून येतात. तशीच ती प्रेमातही दिसू लागलीयत. ग्लोबल जगात प्रेमाची व्याख्या झपाट्याने बदलतीय. कबुतर इतिहास जमा होऊन बराच काळ लोटलाय. त्याजागी पत्रं आली. आता त्याचीही जागा इन्स्टाग्राम, फेसबूक, वॉट्सअॅप, इमेल वगैरेंनी बळकावलीय. इंटरनेटचं जग आभासी आहे. जगाला कवेत घेणाऱ्या या माध्यमांनी भावनांनाही तितकंच आर्टीफीशीयल स्वरुप दिलंय. सौंदर्यातून आकर्षण आणि त्यातून वाढीस लागलेल्या कुतुहलाला, प्रितीची जोड मिळाली की तरुणांना प्रेमाची जाणीव होतेय. पूर्वी सेक्शुअॅलीटी हा प्रेमाचा आधार नव्हता. प्रेमवृध्दीची ती साधना होती. अलिकडे प्रेमाची जागा सेक्स सेलिब्रेशन किंवा त्यातून आलेल्या सेक्शुअल फस्ट्रेशनसारख्या टोकाच्या मानसिक विक्षिप्ततेने घेतलीय. हा वेडेपणा प्रेमातून आलाय की त्याला फास्ट फूड कल्चरच्या विकृत अवताराने आपल्या कवेत घेतलंय, हे शोधावं लागेल.

आजच्या काळात प्रेम हे कुठेतरी हरवलेलं दिसतंय. तरुणाईला आकर्षण आणि प्रेम यामधला फरक समजत नाही. आजच्या तरुणाईला स्पेस हवी असते. पण ही स्पेस घेताघेता ते एकमेकांपासून कधी दुरावतात, हे समजतही नाही. ग्लोबल जगासोबत वेगाने दौडणाऱ्या या तरुणाईने तितकीच वेगवान स्वरूपात आपल्या प्रेमाची व्याख्या केलेली दिसते. पॉर्न फिल्म, त्याला जोड देऊन आलेल्या नव्या कन्सेप्ट प्रेमाला वेगळ्या टप्प्यावर आणताहेत. कॅम्पसमधल्या डिस्कशनमधे प्रेमाच्या गॉसिपची जागा सेक्शुअल कमेंट्सनी घेतलीय. या कमेंट्स म्हणजे प्रेमभावना नाही. त्यातली नैसर्गिकता बाजूला ठेवली तर आलेला अतिरेक हा दुर्लक्ष करण्यासारखा नाही.

अभिव्यक्तीला घाबरत होतं, हे एकवेळ खरं. पण त्याने मर्यादा ओलांडून प्रेमाला वासनेच्या चौकटीवर रेटलं नव्हतं. मुलांचे वॉट्सअॅप ग्रुप्स कॅम्पसच्या गॉसिपपेक्षा नको त्या कमेंट्सनी भरलेले असतात. सेक्शुअल गोंधळातल्या प्रेमाच्या अभिव्यक्तीला आलेलं हे स्वरुप हे फक्त मुलांपर्यत मर्यादीत राहिलेलं नाही. त्याने मुलींनाही कवेत घेतलंय. मुलींनी लैंगिक अभिव्यक्ती स्वीकारलीय हे स्वागतार्ह आहे. पण लैंगिक स्वैराचाराला प्रेमाचं आणि निवडीला अनेकानेक ब्रेकअपचे पर्याय देणं हे थोडंसं पटणारं नाही. मागच्या पिढीच्या प्रेमाला कुठलीही परिभाषा नसायची. मागच्या पिढीच्या प्रेमाची व्याख्या, प्रेमाचं स्वरूप हे खूप वेगळं होतं. त्यामधे भावना दडलेल्या होत्या. त्यामधे सुखदुःख, काळजी, एकमेकांच्या हिताची जाणीव, एक दुसऱ्याविषयी विश्वास-आदर, आपुलकी, समजूतदारपणा असायचा. आज कॅंटीनवरच्या भांडणालाही ब्रेकअपचे ऑप्शन देऊन हाताळलं जातं. ज्या पिढीच्या खांद्यावर बसून हे स्वातंत्र्य मिळवलंय त्या पिढीच्या नैतिकता आणि निरागसतेला आम्ही कुठेतरी काळीमा फासतोय, असं म्हणायला बराच वाव आहे. पूर्वी प्रेम सरळ आणि पारदर्शक असायचं कारण चिठ्ठी पाठवण्याकरता मध्यस्थ तर बोलण्याकरता टेलीफोन तेही मर्यादित आणि भेटण्याकरता चोरट्या वेळा असायच्या. त्यातून आकर्षण, एकमेकांविषयीचं कुतूहल आणि स्वप्नं अबाधित राहायची. आज कुतूहल, आकर्षण संपलंय. वेळेआधी स्वप्नांना ओरबाडून आम्ही मोकळे होतोय.

पूर्वी कॅम्पसने अनेक कलाकार दिले. कवी, साहित्यिक लेखक दिलेत. कॅम्पस आज त्या नैसर्गिक सर्जनाला मुकलाय. पोरं स्वतःला आणि स्वतःसोबत इतरांना घडण्याघडवण्याचा वेळ द्यायला तयार नाहीत. एकमेकांना आणि एकमेकांसोबत जोडलेल्या व्यक्तींना वेळ देण्याचं टाळणारी आमची पिढी आमच्या मागच्या पिढीसमोरच त्यांच्यापेक्षाही अधिक वयात आल्याच्या अविर्भावात वावरतेय. इंटरनेटचं युग आणि तारुण्यांच्या सानिध्यात तरुण पिढी झपाटल्यागत खोट्या प्रेमाच्या नावावर नवनवीन प्रयोगाला चालना देण्याचं काम जोमात करतेय. खरं प्रेम, खोटं प्रेम,लिव इन, ब्रेकअप,पॅचअप नवनवीन शब्द आपल्याला एका निराळ्या भावविश्वाची अनुभूती देतायत. प्रेम ही सौंदर्यासंबंधीची कल्पना की कामवासनेची अतिरेकी भावना या असंख्य न सुटणाऱ्या प्रश्नांचा गुंता कधीतरी आपल्या समोर समस्येचं विक्राळ स्वरुप घेऊन येईल हे मात्र नक्की. केवळ शारीरिक सुख किंवा इतर काही स्वार्थ मनात ठेऊन प्रेम करणं चुकीचं आहे. त्यामुळे प्रेमात धोका मिळाल्यास किंवा अपयश आल्यास केवळ विकृती जन्माला येते. अशा भावनेला प्रेम म्हणता येणार नाही. प्रेमात स्वार्थ नसावा. प्रेमात काहीच नाही मिळालं तरी चालेल. पण समोरच्या व्यक्तीपर्यत फक्त आपल्या भावना पोचल्या, तरी पुष्कळ असतं. त्यात समर्पण असतं. या समर्पणाची भावना नव्या पिढीने जपायला हवी.



**आजच्या काळात प्रेम हे कुठेतरी हरवलेलं दिसतंय. तरुणाईला आकर्षण आणि प्रेम यामधला फरक समजत नाही. आजच्या तरुणाईला स्पेस हवी असते. पण ही स्पेस घेताघेता ते एकमेकांपासून कधी दुरावतात, ते समजतही नाही. ग्लोबल जगासोबत वेगाने दौडणाऱ्या या तरुणाईने तितकीच वेगवान स्वरूपात आपल्या प्रेमाची व्याख्या केलेली दिसते.**

# माजलगाव तालुक्यातील सरपंच, उपसरपंच निवडी जाहीर

## दिंद्रुड सरपंचपदी अजय कोमटवार, नित्रुड सरपंचपदी कॉ.दत्ता डाके; निवडीनंतर समर्थकांचा जल्लोष

प्रतिनिधी

माजलगाव : सर्वांचे लक्ष लागलेल्या माजलगाव तालुक्यातील पाच ग्रामपंचायतीच्या सरपंच, उपसरपंच निवडी पार पडल्या. सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेल्या दिंद्रुडच्या सरपंचपदी अपेक्षितपणे अजय दिलीप कोमटवार हे विराजमान झाले, तर नित्रुड ग्रामपंचायतीवर कम्युनिस्ट पक्षाचे वर्चस्व राहीले, सरपंचपदी कॉ.दत्ता डाके हे विराजमान झाले. दरम्यान, दिंद्रुड, नित्रुडसह गंगामसला, मोगरा, चोपनवाडी या ग्रामपंचायतींच्याही सरपंच, उपसरपंच पदाच्या निवडी जाहीर झाल्या.

माजलगाव तालुक्यातील दिंदुड ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी अजय कोमटवार यांची सर्वानुमते करण्यात आली, तर उपसरपंचपद रिक्त ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. निवडीनंतर नूतन सरपंचांचा सत्कार करण्यात आला. उपसरपंच पदासाठी दिलीप कोमटवार यांच्या परिवर्तन पॅनलमधील सहा अर्ज दाखल करण्यात आल्याने काहीवेळ संभ्रम निर्माण झाला. उपसरपंच पदासाठी देशमाने अविद्या मधुकर, शिंदे ज्योती रमेश, चांदबोधले भागुबाई विश्वनाथ, उबाळे सिधू रामेश्वर, शेख नाजमिन अजिम आणि कोमटवार अजय दिलीपराव या ग्रामपंचायत सदस्यांनी अर्ज दाखल केले. मात्र सर्व सदस्यांची बैठक होऊन उपसरपंच पद रिक्त ठेवण्याचा सर्वानुमते निर्णय घेत पेच सोडवण्यात पॅनल प्रमुखांना यश आले. निवडणूक


अजय कोमटवार
दिंद्रुड : सरपंच


कॉ.दत्तात्रय डाके
नित्रुड : सरपंच


उत्तम जाधव
नित्रुड : उपसरपंच

अधिकारीपदी माजलगाव तालुका कृषी अधिकारी सुहास हजारे यांनी काम पाहिले. ग्रामसेवक नवनाथ पवार यांनी सहकार्य केले. तसेच टकारवाडी, सुल्तानपूर, बडेवाडी, लहामेवाडी सह अनेक तांडे असा विस्तार असलेली सर्वात मोठ्या नित्रुड ग्रामपंचायतच्या सरपंचपदी कॉ.दत्तात्रय डाके तर उपसरपंचपदी उत्तम जाधव यांची बुधवारी बिनविरोध निवड झाली. ग्रामसेवक डी.एल.गडपाळे, आजबे, मंडळ अधिकारी पी.एस. मुळाटे, एस.व्ही.वाघमारे यांनी निवडणुकीचे कामकाज पाहिले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य पुष्पा गायकवाड, सविता बडे, मुक्ताबाई पवार, सखूबाई पवार,विकास डाके, सुषमा मुंडे, शफीक मुसा शेख, चंद्रकला तेलगड, रुक्मिणी पवार, दिनेश गायकवाड, कांताराव गायकवाड, आप्पा बडे, पांडुरंग आवाड, बबिता मारोती राठोड उपस्थित होते.

### मोगरा : सरपंचपदी शामराव राठोड, उपसरपंचपदी तुकाराम भोजने




माजलगाव : राजकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण ओळखल्या जाणाऱ्या मोगरा ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी शाम काळूराम राठोड यांची तर उपसरपंचपदी तुकाराम सर्जेराव भोजणे यांची निवड झाली.मोगरा ग्रामपंचायतीच्या सदस्यपदी शाम राठोड, तुकाराम भोजणे, गंगा धुमाळ, माया घनघाव, गंगा राठोड, गोपिका सावंत, सुनिता घनघाव, उजमा शेख, यशोदा चव्हाण, भीमराव चव्हाण, भागूबाई चव्हाण, अरुणा पवार, कविता जाधव हे उमेदवार विजयी झाले होते. यानंतर झालेल्या सरपंचपदाच्या निवडीत शाम राठोड यांची तर उपसरपंचपदी तुकाराम भोजणे यांची निवड झाली. राष्ट्रवादी समर्थक शाम राठोड यांच्या निवडीबद्दल स्वागत होत आहे.

### चोपनवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी सोनाली बडे, उपसरपंचपदी मोहन वनवे




माजलगाव : तालुक्यातील चोपनवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी सोनाली विलास बडे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली, तर उपसरपंचपदी मोहन श्रीरंग वनवे यांची निवड झाली आहे. सदस्यपदी शोभा भिमराव काटे, रत्नमाला अंगद ढहाणे, शेख रेश्मा शेख राजू, बलभिम दगडू वनवे, गणेश बालासाहेब वनवे या उमेदवारांची बिनविरोध निवड झाली होती.

### गंगामसला ग्रामपंचायत सरपंचपदी सीमा सोळंके, उपसरपंचपदी डॉ.अभिजीत सोळंके यांची निवड




माजलगाव : गंगामसला ग्रामपंचायतच्या सरपंचपदी सीमा भालचंद्र सोळंके, तर उपसरपंचपदी डॉ.अभिजित सोळंके यांची निवड झाली आहे. पहिल्यांदाच गंगामसला ग्रामपंचायत भाजपाच्या एकहाती ताब्यात आली आहे. निवडणुकीत ऋतुजा प्रदीप सोळंके, अमोल भीमराव सोळंके, पंकज विठ्ठल पंडित, अश्विनी तुळशीराम धरपडे हे उमेदवार विजयी झाले आहेत. ११ सदस्य असलेल्या या ग्रामपंचायतीमध्ये सहा सदस्य भाजपचे तर चार सदस्य राष्ट्रवादी काँग्रेस समर्थक आणि एक सदस्य अपक्ष निवडून आला आहे. निवडीनंतर समर्थकांनी जल्लोष केला.

### ‘योध्दा’ मंचकडून शिवरायांना अभिवादन



माजलगाव : योध्दा सामाजिक युवा मंचच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पावन स्मृतीस अभिवादन करताना माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धनंजय फराटे, योद्धा सामाजिक युवा मंचचे अध्यक्ष प्रदिप तांबे, अभिजित देडे, भगीरथ तोडकरी, सचिन पट्टेकर.

## तुळजाभवानी अर्बनच्या क्वीआर कोड सुविधेचा शुभारंभ

प्रतिनिधी

माजलगाव : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीदिनाचे औचित्य साधून तुळजाभवानी अर्बनने आपल्या सभासदांना अत्याधुनिक बरोबरच तत्पर सेवा पुरवण्यावर सतत भर असणाऱ्या डिजीटल बँकिंग क्षेत्रात एक पाऊल पुढे टाकत शुक्रवार दि.१९ फेब्रुवारी शुक्रवार रोजी आपल्या क्वीआर कोड सुविधेचा शुभारंभ केला. सदरील शुभारंभ सोहळा संस्थेच्या मुख्य कार्यालयाचे ठिकाणी पार पडला.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुरेंद्र रेदासनी, रामराजे रांजवण, संजय सोळंके, शाम देशमुख, पं.स.सभापती भागवतराव खुळे, वैजनाथराव जाधव, शिवप्रसाद खेत्री आदी मान्यवरांसह संस्थेचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ यांची उपस्थिती होती.



क्वीआर कोड सुविधेचा शुभारंभ करतांना अध्यक्ष चंद्रकांत शेजूळ, सुरेंद्र रेदासनी, रामराजे रांजवण, संजय सोळंके, शाम देशमुख, पं.स.सभापती भागवतराव खुळे.

## अवकाळीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करा

### भाजपा तालुकाध्यक्ष अरूण राऊत यांची मागणी

प्रतिनिधी

माजलगाव : गेल्या १८ फेब्रुवारी रोजी रात्री अचानक झालेल्या अवकाळी पावसामुळे रब्बी हंगामातील पिकांचे मोठे नुकसान झाले असुन या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करावेत व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी भाजपा तालुकाध्यक्ष अरूण राउत यांनी निवेदनाव्दारे तहसिलदार यांचेकडे दि. २० फेब्रुवारी रोजी केली आहे.

अवकाळी पावसामुळे तालुक्यात ज्वारी, गहू, हरभरा, पपई आदींसह रब्बी हंगामातील काढणीस आलेले पिके भुईसपाट झालली आहेत. २०२० चा खरीप पिक विमा अद्याप आलेला नाही, आघाडी शासनाने सरसकट पिक विमा देण्याचे आश्वासन दिले आहे त्याचा त्यांना विसर पडला असुन विमा द्यावा, तालुक्यातील विज ट्रान्सफार्मर बंद केले आहेत, ते तात्काळ चालू करावेत आणि शासनाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करून तात्काळ शेतकऱ्यांना मदत द्यावी अन्यथा भारतीय जनता पार्टी माजलगावच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा तालुकाध्यक्ष अरूण राउत यांनी दिला आहे. यावेळी बबनराव सोळंके, मनोज जगताप, लतीफ नाईक, निळकंठ भोसले, धनंजय फपाळ, विनायक रत्नपारखी, शरद कचरे, अर्जुन पायघन, अविनाश सोळंके, नामदेव मुळे, संतोष जाधव, सरपंच खय्युम पठाण, अजुम भाई, अजय सोळंके, सुहास लंगडे, सुभाष कांबळे, श्रीकांत मेंडके, दत्ता क्षिरसागर, बाळासाहेब शिंदे, सुशांत जाधवर, शेषेराव खाडे, जयराम गायकवाड, घायतिडक, यांचेसह भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

## कासारी ग्रामपंचायत सरपंचपदी सौ.सुनंदा बडे

प्रतिनिधी

धारूर : तालुक्यातील कासारी या ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच पदाची निवड करण्यात आली. यासाठी दि.१६ फेब्रुवारी रोजी ग्रामपंचायत कार्यालयात विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. कासारीच्या सरपंच पदावर सौ.सुनंदा महादेव बडे तर उपसरपंच म्हणून त्यांचाच मुलगा सदाशिव महादेव बडे यांची वर्णी लागली. कासारीचे सरपंचपद हे इतर मागास प्रवर्ग महिलेसाठी राखीव होते.



सरपंच, उपसरपंच, सदस्य यांच्या निवडीबद्दल गावकऱ्यांनी जल्लोषात स्वागत केले.

### ‘साई’कडून ‘माजलगाव अर्बन’ला शुभेच्छा



माजलगाव : येथील माजलगाव अर्बनच्या शुभारंभप्रसंगी चेअरमन आसाराम घायतिडक यांचा साई ग्राफिक्सतर्फे शुभेच्छा भेट देवून सत्कार करताना तुळजाभवानी अर्बनचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ, साई ग्राफिक्सचे संचालक अशोक कांबळे आदी.

### ‘सिटी’तर्फे दादा,आबांचा सत्कार




माजलगाव : येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरातील नामांकित सिटी हॉटेल मध्ये आमदार प्रकाशदादा सोळंके, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोकआबा डक यांनी सदिच्छा भेट दिली असता त्यांचा सत्कार करताना सिटीचे मालक खुर्शिद पटेल.

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मानवतावादी विचारांची जगाला गरज

प्रतिनिधी

बीड : रयतेचे राजे महाराष्ट्राची अस्मिता विश्ववंदनीय छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती सर्वांसाठी प्रेरणा देणारी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार मानवतावादी असून त्यांच्या महान विचारांची संपूर्ण जगाला गरज आहे, असे प्रतिपादन नगरसेवक शैलेश नरसिंगराव नाईकवाडे यांनी केले.



पुढे बोलताना शैलेश नाईकवाडे म्हणाले, आज संपूर्ण जगावर कोरोनाचे महासंकट घोघांवत आहे, त्याचा सामाना करावा लागत आहे. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे आपले सण-उत्सव घरामध्ये साजरे करावे लागत आहे, आपली अस्मिता असलेली शिवजयंती घराघरात साजरी करून सर्वांनी नवा आदर्श निर्माण केला आहे, असेही नाईकवाडे यांनी सांगितले.




## शिवजयंतीनिमित्त पाटील साहेब प्रतिष्ठानचे अभिनव अभिवादन

### माजलगावमध्ये १०१ रक्तदात्यांनी केले रक्तदान

प्रतिनिधी

माजलगाव : रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून येथील पाटील साहेब प्रतिष्ठानच्या वतीने रक्तदान शिबीर घेतले. या शिबीरात १०१ रक्तदात्यांनी रक्तदान केले, अशी माहिती पाटील साहेब प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राम नरवडे यांनी दिली.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाने दिलेले सर्व नियम पाळून पाटील साहेब प्रतिष्ठानतर्फे शिवजयंतीचे आयोजन अभिनव पध्दतीने केले. अनावश्यक खर्चाला फाटा देवून सामाजिक दायित्व स्विकारत रक्तदान शिबिराचे आयोजन करून रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन केले. प्रारंभी माजलगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून प्रतिष्ठाणच्या वतीने माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांनी अभिवादन केले.



#### ‘छत्रपती शिवाजी महाराज सर्वांची अस्मिता’



छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वांची अस्मिता आणि प्रेरणास्थान आहे. त्यांची जयंती म्हणजे ऊर्जा देणारा सोहळा आहे. सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून पाटील साहेब प्रतिष्ठानने शिवजयंतीचे औचित्य साधून रक्तदान शिबीर आयोजित केले. या शिबिराला रक्तदात्यांनी मोठा प्रतिसाद दिला, हेच छत्रपती शिवाजी महाराजांना खरे अभिवादन आहे, असे प्रतिक्रिया पाटील साहेब प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राम नरवडे यांनी दिली.

यापसंगी पाटील साहेब प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राम नरवडे, बीड जिल्हा युवासेनेचे शुभम डाके, जयंती अध्यक्ष गोविंद काळे, मयूर आमसुले, वैभव राऊत, दीपक जाधव, मयुर आगे, भगवान नवले, विश्वजीत होके, बाळासाहेब निंबाळकर, कार्तिक फपाळ, गणेश तौर, वीर झोडगे, अशोक मोरे, संतोष धिरडे, श्रीराम निंबाळकर, करण थोरात, अजय नरवडे, गोविंद लोखंडे, केशव साळुंके, बली मस्कर, केशव थोरात आदींची उपस्थिती होती. यावेळी शितल मंडप यांनी विशेष सहकार्य केले.

आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय,23, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022, **सल्लागार संपादक : चंद्रकांत शेजुळ**